॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## ACADEMIC (APPROVAL) SECTION

Phone: (02462) 229242
FAX No. (02462) 229574

website: srtmun.ac.in
E-mail:approvalsrtmun@gmail.com

Acad/Approval/02/2022-23/ 35

Date : June 24, 2022

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
(कला, वाणिज्य व विज्ञान)
**प्रस्तुत विद्यापीठ**

विषय : श्री.संदिप कर्णेकर व श्री ओ.वी.चव्हाण यांनी हिवाळी—२०२१ बी.कॉम पदवी परीक्षेत केलेल्या गैरवर्तणूकी बाबत...

संदर्भ : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ यांचे पत्र क्र.परीक्षा/समन्वय/२०२२—२३/२७० व २७१ दिनांक ३०/०५/२०२२.

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे (अनुदानित व विनाअनुदानित) प्राचार्य यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी—२०२१ च्या बी.कॉम. अभ्यासक्रमाच्या परीक्षेत श्री संदीप व्यंकटराव कर्णेवार, यशवंत महाविद्यालय, नांदेड येथील घडयाळी तासिका तत्वावरील सहाय्यक प्राध्यापक व श्री ओ.बी. चव्हाण, राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि.नांदेड येथील अपात्र सहाय्यक प्राध्यापक यांनी राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि.नांदेड येथील परीक्षा केंद्रावर गैरवर्तणूक केल्याबद्दल सदर प्रकरण महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठाच्या गठीत ४८(५)(अ) समितीपुढे ठेवण्यात आले. सदर प्रकरणी समितीने श्री संदीप व्यंकटराव कर्णेकर व श्री ओ.बी.चव्हाण यांची कसुन चौकशी करून समितीने त्यांच्यावर सर्व चौकशीअंती खालीलप्रमाणे कारवाई करण्याबाबत दि.०४/०४/२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये शिफारस केली आहे.

१) श्री ओ.वी.चव्हाण सहाय्यक प्राध्यापक पदासाठी अपात्र आहेत, भविष्यात त्यांना कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यास प्रतिबंध करणेबाबत विद्यापीठ परिसरातील सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळवावे (महाविद्यालय विना अनुदानित असले तरी).

२) श्री कर्णेकर संदीप व्यंकटराव यांना विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयात नियुक्ती करण्यात येवू नये/नियुक्तीस प्रतिबंद करावे तसेच रूजू असल्यास त्यांची नियुक्ती तत्काळ रद्द करण्यात यावी.

सदर प्रकरणी मा.कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे ४८(५)(अ) गठीत समितीने केलेल्या शिफारसी प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, कळावे.

आपला विश्वासु,

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

प्रत माहितीस्तव —

१) मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ

२) सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.